## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २८४ वा | बुधवार, दि. २५ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# वडिलांना लाखभर पगार! तरीही डॉ. ओंबासेंना 'नॉन-क्रिमी लेयर' कसे मिळाले?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बनावट कागदपत्रांच्या आधारे सनदी अधिकारी झालेल्या पूजा खेडकर हे प्रकरण ताजे असताना महाराष्ट्रात आणखी एका सनदी अधिकाऱ्यांचे कारनामे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासकीय सेवेत नक्की काय सुरु आहे, असा प्रश्न सामान्य नागरिक विचारत आहे.

सोलापूरचे महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे जेव्हा आयएएस झाले त्यावेळी त्यांनी काही खोटे कागदपत्र दाखल केले असल्याचा संशय व्यक्त केला आहे. डॉ. सचिन ओंबासे यांनी खोटी माहिती देऊन नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र मिळवत, सरकारची फसवणूक केली, असा आरोप केला जात आहे.

केंद्र सरकारने याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांना या कागदपत्रांनी तपासणी करण्याचे आदेश दिले आहे. राज्याच्या सचिव सुजाता सौनिक यांनी याला दुजोरा दिला आहे. त्यांना आयएएस व्हायचं होते त्यासाठी त्यांनी चार वेळा सर्वसाधारण गटातून परीक्षा दिल्यानंतर त्यांना यश आले नाही.



त्यानंतर त्यांनी पाचव्यांदा ओबीसी गटातून परीक्षा दिली. त्यासाठी त्यांनी नॉन-क्रिमी लेयर दाखल केले, हे नॉन-क्रिमी लेयर त्यांना कसे मिळाले याबाबत सध्या संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे सचिन ओंबासे यांची नोकरी धोक्यात येऊ शकते का? असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

आर्थिक परिस्थिती उत्तम असतानाही त्यांना नॉन-क्रिमी लेयर कसे मिळाले. त्यांचे वडील साताऱ्यातील रयत शिक्षण संस्थेत प्राध्यापक आहेत. त्यांना किमान एक लाख वेतन होते, त्यांचा वार्षिक उत्पन्न हे 12 लाख रुपये होते, असे असताना सुद्धा त्यांनी वडीलांचे उत्पन्न साडेचार लाख रुपये दाखवले, त्या आधारे त्यांनी नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र कसे मिळवले? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

त्यांचे वडील प्रा.छगनलाल ओंबासे यांचे उत्पन्न जास्त असतानाही त्याचे उत्पन्न कमी कसे दाखवले, याबाबत माहिती अधिकारात माहिती विचारले असता ही माहिती उपलब्ध नसल्याचे माहिती अधिकार विभागाकडून सांगण्यात आले.

प्रशासकीय सेवेतील अधिकारी खूर्ची मिळविण्यासाठी काय करु शकतात, असा प्रश्न यानिमित्ताने विचारण्यात येत आहे. केंद्र सरकारने सुजाता सौनिक यांना सचिन ओंबासे यांचे इतर मागासवर्गीय -नॉन-क्रिमी लेयर (ओबीसी-एनसीएल) प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहण्यास सांगितले आहे.

# क्रांती-परीस लोकनेते प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील

माळशिरसच्या ओसाड माळरानावर नंदनवन फुलवण्याचा सहकार महर्षींचा वारसा पूढे घेऊन जाणारे लोकनेते, आपल्या सर्वांचे आदर्श श्रद्धास्थान प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांना ६७ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

"विना सहकार नाही उद्धार" हे तत्व बाळगणारा महामानव या धरतीवर दुर्मिळ आहे. आज प्रत्येक व्यक्ती स्वार्थाच्या पाठीशी धावत आहे. अनेकजण इतरांच्या कमार्चा शिडीसारखा वापर करून उच्चस्थानी पोहोचण्याचा प्रयत्न करतात व कालांतराने पदोच्च्य होताना दिसतात. आपल्या कर्तृत्वाचा जो पाया असतो तो भक्कम व निष्पाप असावा लागतो. तरच आपली वाटचाल पवित्र असते हे जाणून वाटचाल करणारे, आमचे दैवत म्हणजे पाप्पासाहेब! अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीत माणूस आपल्या मानवी जीवनाची मल्ये विससरून जातो, व स्वतःस योग्य वाटेल तीच वाट त्याला योग्य वाटत असते व सवार्नी ते मान्य करावे असा त्याचा अट्टाहास असतो. अगदी याच धोरणावर पाप्पासाहेबांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून जाब विचारला. परमेश्वराने सांगितलेली मुल्ये जनतेमध्ये रुजवणारा माणुस हा परमेश्वरच असतो. पप्पासाहेबांनी समाजामध्ये ही नितीमुल्ये स्वतःच्या कृतीद्वारे सिद्ध केले.

वारसा मिळतो परंत तो अखंड चालवण्यामध्ये खरी कसरत असते. त्यासाठी योग्य धोरण असावे लागते. सहकार महर्षींच्या कारकीदीर्चा जिता जागता अनुभव घेत पप्पासाहेबांनी माणूस जोडण्याचा मंत्र अखंडपणे जपला व याचा परिणाम म्हणून आज त्यांच्या पाठीशी जीवापाड प्रेम करणारी जनता पर्वताप्रमाणे उभी असलेली आपणास पहावयास मिळते. एवढे मोठे पाठबळ असुनही जीवात जीवमान असे तो जनसेवा करू!" हे त्यांचे ब्रीदवाक्य महान लोकांनाही आत्मपरीक्षण करण्यासाठी प्रवृत्त करणारे आहे.

पप्पासाहेबांच्या व्यक्तिमत्वात ते नितळपणे अणि निस्वार्थीपरणे जाणवते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आदर्श कामगिरी करण्याचे भाग्य त्यांना लाभलेले आहे. समाजाची जपणूक करता करता, सामन्याच्या मनाचीही जपणूक करण्याचा त्यांचा मानस आजही आपणास दिशादर्शक व दीपस्तंभ आहे.

पप्पासाहेबांनी जे काम हाती घेतले ते प्रत्येक काम परिसाच्या स्पशार्ने दैदिप्यमान बनले आहे.

त्यांची काम करण्याची खुबी ही परीसाहन कमी नाही. त्यांनी



१९८१ मध्ये शंकरराव मोहिते-पाटील ब्लड बँकेची स्थापना केली., लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे १९८२ साली शंकरराव मोहिते -पाटील इंडस्ट्रीयल सोसायटीची स्थापना केली. आपल्या समाजकायार्ला कधीच विराम दिला नाही. जनतेच्या हितासाठी अनेक सामाज उपयोगी कामे हाती घेतली व अखंडपणे चालूच ठेवली. महर्षीच्या कामाची सूत्रे हाती घेणारे प्रतापसिंह हे एकमेव होते. श्री. शंकर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांच्या समाजकायार्ला गती मिळाली. कारखान्याचे अध्यक्ष असताना त्यांनी कारखाना विस्तार आणि शेतकऱ्यांचे हित सांभाळण्याची महत्वपूर्ण जबाबदारी काटेकोरपणे सांभाळली.

१९९२ ते १९९६ या कालखंडात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना पप्पासाहेबांनी ऐतिहासिक विक्रम निर्माण केला. सोलापूर जिल्हा परिषद ही महाराष्ट्रात २८ व्या क्रमांकाची जिल्हा परिषद होती. पप्पासाहेब जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होताच, विविध योजना आणि प्रश्नांना गती दिली. त्यामुळे ही जिल्हा परिषद राज्यात पहिल्या क्रमांकावर नेऊन ठेवली. याच वेळी पाप्पासाहेबांनी जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी विम्याची सुविधा राबवली. पुढे हि योजनाच महाराष्ट्र शासनाने बरवून पप्पासाहेबांच्या कायार्चा गौरव केला. तसेच ग्रामीण भागात शाळेसाठी १२०० शाळाखोल्या बांधल्या. शेतीसाठी पाण्याची सुविधा निर्माण व्हावी यासाठी कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या योजना सक्षमपणे राबविली.

संकटसमयी धावुन जाण्याचा पप्पासाहेबांचा धाडशी स्वभाव ! त्यांनी १९९३ च्या किल्लारी

भुकंपावेळी जनसेवा संघटना आणि सोलापूर जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमानाने मदत कार्य करून अनेकांचे प्राण वाचवले व निराधारांना मदतीचा हात देऊन त्यांचे पुनर्वसन केले, या भूकंपामध्ये अनाथ झालेल्या मुला मुलींना पप्पासाहेबांनी जनसेवा संघटनेच्या रूपाने पालकत्व मिळवून दिले. तसेच गुजरातमध्ये झालेल्या भुकंपावेळी जनसेवा संघटनेच्या माध्यमातून ६ लाख रुपयांचा निधी पाठवत प्रांतवाद व भाषावाद या खुळचट संकल्पांना कृतीतून त्यांनी जोरदार तडा दिला आणि असल्या संकल्पना आपल्या व्यक्तीमत्वात आणि जनसेवेत नसतात हे दाखवून दिले.

शंकरराव मोहिते -पाटील ब्लड बँकेच्या वतीने, १९७८ पासून प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीर घेतले जाते. पाप्पासाहेब राज्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार चळवळींचा पुरेपूर वापर केला. तसेच जिल्ह्यातील सहकार चळवळीला मदत देवून वैभव प्राप्त करून दिले. त्यांनी अपल्या कामाचा जो वारसा जपला, ती सर्व कामे यशस्वी झाली. त्यातील एक आधारवड म्हणजे त्यांनी स्थापन केलेली जनसेवा संघटना. १९७५ साली जनसेवा संघटनेची वाटचाल सुरु झाली व जिल्हा परिषद अध्यक्ष असण्याच्या काळात हीच संघटना स्वकरत्त्वाने बहरून गेली. याच माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा छड़ा लावून त्या सामन्यांच्या दारापर्यंत त्यांनी आणून पोहोचवल्या हे केवळ समाजाविषयी असलेल्या अपुलकीमुळेच!

आदरणीय पपासाहेबांचा स्वभाव उमदा, कृतीशील व सहसंवेदनशील होता. प्रतिकुल परिस्थितीमध्ये आव्हान स्वीकारणे व लढवय्या सेनापतीप्रमाणे ते पूर्ण करून दाखवणे यात नेहमीच त्यांचा हात खंडा राहिला.

सामाजिक दरी व वाद ते आपले कुटुंब समजून सोडवत, दोन्ही बाजू कशा सुरक्षित राहतील याची दृष्टी त्यांना स्वभावतः मिळालेली होती. आज माळशिरस तालुक्यातील असलेले शेतकरी व त्यांची (पान 2 वर..)



## संपादकीय

# अनंत तीर्थाचे माहेर

वारीला जाताना कितीही कष्ट झाले तरी ते सहन करत, नव्हे ते या भक्तीच्या आनंदात जाणवतच नाहीत. ऊन, वारा, पाऊस कोणतीही पर्वा न करता विठ्ठलाच्या भेटीच्या वेडात पंढरीच्या वाटेवर ब्रह्मानंदात दंग झालेले असतात. एकादशी व्रत, पंढरीची वारी आणि नामभक्ती या भक्तिसाधनेस वारकरी पंथात अनन्यसाधारण महत्त्व आहे. तसेच चार प्रमुख वारींपैकी आषाढी व कार्तिकी या दोन एकादशीला विशेष महत्त्व दिले जाते. आषाढीला तर महाराष्ट्राच्या सहिष्णू मातीत भावभक्तीच्या अबीर-बुक्क्यांची उधळण होते. रामकृष्ण हरीच्या व ग्यानबा-तुकाराम या जयघोषाने आसमंत दणाणून जातो. एरवी शांत असणारे चंद्रभागेचे वाळवंट या दिवशी भक्तीच्या महापुराने दुथडी भरून वाहू लागते. पंढरीच्या राउळातील विठू माऊलीचा गाभाराही या दिवशी गहिवरतो आणि 'केव्हा भेटशी केशवा ! या आर्त हाकेची प्रतीक्षा संपते. पांडुरंगाच्या संजीवक चरण स्पर्शाने अवघे जीवन उजळून गेल्याचा व उजळले भाग्य आता अवघी चिंता निवारल्याची अनुभूती सर्व भक्तगणास येते. मायबाप विठ्ठलाच्या दर्शनानंतर 'जो आनंद वारकऱ्याला होतो, त्याचे वर्णन अनुपम्य आणि अगम्य आहे. हा सुखसोहळा काय वर्णू ? अशी या आनंदाची स्थिती असते. विठोबाच्या गाभाऱ्यात येणारी अपूर्व अनुभूती, इतर कोणत्याही देवालयात प्रतीत होत नाही. म्हणूनच वारकरी संतानी 'एको देवो केशवा !' हा मूलमंत्र दिला. आषाढी आली की वारकरी संतांना पंढरीची ओढ लागते. भेटीलागी जीवा लागलीसे आस ! पाहे रात्रदिस वाट तुझी। अशी मनस्थिती होते अन आपोआपच पावले पंढरीच्या वाटेवर पडू लागतात. आषाढीचा हा अगाध महिमा आहे. आजही महाराष्ट्रात असे अनेक वारकरी आहेत की ते न चुकता वारी करतात. आषाढीच्या भक्तिरसात चिंब न्हाऊन नवी ऊर्जा घेऊन परत येतात.संत तुकाराम महाराजांनी तर पंढरीच्या या अगाध महिमाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

'तीर्थे केली कोटीवरी। नाही देखिली पंढरी। जळो त्याचे ज्यालेपण। न देखेची समचरण। तुका म्हणे विठ्ठलपायी। अनंत तीर्थे घडली पाही। सर्व मराठी संतानी पंढरीला सकळ तीर्थाचे माहेर संबोधले. संत नामदेव म्हणतात, 'अनंत तीर्थाचे माहेर अनंत रूपांचे सार। अनंता अनंत अपार। तो हा कटी कर ठेवोनी उभा।

संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत जनाबाई, संत तुकाराम या सर्व संतांच्या अभंगांतून विठ्ठलाविषयीचा आत्यंतिक श्रद्धाभाव प्रकट झाला आहे. उत्कट भावनेचा उमाळा आणि असीम भक्तीचा जिव्हाळा यांचा आविष्कार म्हणजे संत काव्य.

संत तुकाराम म्हणतात, 'तीर्थाचे जे मूळ। व्रताचे जे फळ। ब्रह्म ते केवळ। पंढरिये। ते आम्ही देखिले आपुल्या नयनी। फिटली पारणी डोळियांची। असा डोळ्यांचे पारणे फेडणारा हा उत्सव असतो. पंढरीत दाखल झाले की गर्जणारे भीमातीर, तेथील वारकऱ्यांची मांदियाळी, चंद्रभागा, भक्त पुंडलिक पाहून मराठी माणसास धन्यता लाभते. या सर्व सुखाच्या या आगारात त्याची तहानभूक हरवते. लौकिक सुखाच्या पुढचे हे सुख खूप मौलिक असते.

म्हणून तर या सुखाचा महिमा गाताना संतानी म्हटले आहे. जाता पंढरीशी सुख वाटे जीवा । आषाढीच्या या आनंदाचा अनुभव घेतल्यावर काय अवस्था होते, त्याबद्दल तुकोबा म्हणतात, 'पंढरीस जाय। तो विसरे बापमाय। अवघा होय पांडुरंग। राहे धरुनिया अंग। तुका म्हणे मळ। नासी तत्काळ हे स्थळ। असा पंढरीचा महिमा आहे. ही अदैवेत अवस्था येथे प्राप्त होऊन मनातील सर्व मळभ दूर होतात. तर संत नामदेव म्हणतात, अवघे हे पवित्र पांडुरंग क्षेत्र। सुखची सर्वत्र भरले असे।

ते म्हणतात, सुखालागी करिसी तळमळ। तरी तू पंढरीसी जाय एक वेळ। तेथे अवघाची सुखरूप होसी। जन्मोजन्मीचे श्रम विसरसी। संत नामदेवांच्या या उक्तीला प्रमाण मानून अगणित विठ्ठलभक्त दरवर्षी पंढरीस दाखल होतात. अशा कित्येक आषाढी-कार्तिकी येऊन गेल्या पण पंढरीचे प्रेम वाढतच आहे. हे लोकदैवत म्हणजे महाराष्ट्राचा आत्मा आहे. ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक माहेर आहे. तमाम मराठी माणसांचे ते ऊजार्केंद्र आहे. हा कष्टर्कयांचा श्रमिकांचा देव आहे. म्हणूनच इथे जी श्रीमंती दिसते ती, मानवतेची, समतेची, ऐक्याची ! भक्तीच्या या अथांग महासागरात अवघा महाराष्ट्र एकवटतो. खेळ मांडीयेला वाळवंटी घाई। नाचती वैष्णव भाई रे। या सर्वांग सुंदर अभंगातून तुकोबांनी या अनुपम्य सुख सोहळ्याचे जे वर्णन केले आहे ते त्यांच्या कवित्वाचे, प्रतिभेचे सर्वस्पर्शी दर्शन तर आहेच; पण येथे जे मानवतेचे चित्र, जे ऐक्य, जो आनंद त्यांनी अभिव्यक्त केला आहे तो महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडवणारा आहे.

रूप, रस, गंध, नाद, स्पर्श या पंचेद्रीयांच्या या अनुभूतीबरोबरच सामाजिक एकतेचे भक्तिमय चित्र येथे रेखाटले आहे. त्याचे प्रत्यक्ष दर्शन घडते ते केवळ पंढरीसच. 'वर्णाभिमानविसरली याती। एक एका लोटांगणी जाति रे।' असा हा निखळ आनंदाचा भक्तिमेळा दर आषाढीस भरतो. वारकरी संस्कृतीने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला दिलेली ही अनमोल देणगी आहे.

## प्रबोधन

# माणसाचा पशू । करी जादू तिची

छत्रपती शाहू महाराजांचा निर्व्यसनीपणा प्रसिद्ध होता. त्यांनी दारूच्या थेंबाला स्पर्शही केला नाही. वडिलांचं पितृछत्र हरपलं ते त्यांच्या व्यसनीपणामुळे, ही खंत त्यांनी जन्मभर बाळगली. एक आठवण सांगतात, छत्रपती शाहू शिकारीवर गेले असता एकदा घोड्याला ठेच लागून पडले. बेशुद्ध झाले. सभोवती लोक जमले. कुणी म्हणाले, ब्रँडी पाजा, शुद्धीवर येतील. हे ऐकताच महाराज शुद्धीवर येत म्हणाले, त्याची काही गरज नाही, खबरदार तसं कुणी कराल तर! मी बरा आहे.

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळ सुरू केली तेव्हा, दौऱ्यांत दारूचं व्यसन श्रीमंतांपासून सर्वांना वेढून राहिल्याचं त्यांना जाणवलं. लोकांना दारूच्या व्यसनातून मुक्त करणं आवश्यक आहे, हे जाणून त्यांनी दारू दुकानांपुढे सत्याग्रह सुरू केला. दारूविक्री केंद्रांवर पिकेटिंग करणं, हे सत्याग्रहींचं एक कर्तव्यच होऊन गेलं. स्वातंत्र्यानंतर शासनाने दारूबंदी केली. पण नंतर लोकानुनयामागे लागलेल्या राजकीय पक्षांनी दारूबंदी उठवली आणि जनतेला गटार गंगेतवाहून जाण्याचं - बुडून मरण्याचं स्वातंत्र्य मायबाप सरकारने बहाल केलं.

नाटककार राम गणेश गडकऱ्यांनी एकच प्याला नाटक लिहिलं, त्याला २०१९ला शंभर वर्षे होतील. गेली ९०वर्षं अक्षरवाङ्मय ठरलेलं हे नाटक दुदैर्वाने शतकानुशतकं त्याच पदावर राहाणार आहे ! गडकऱ्यांच्या स्वानुभवातून ते उतरलेलं असल्याने दारूचा दुष्प्रभाव त्यांनी भयंकर शब्दांत सांगितलाय. नायक सुधाकर दारूचं स्वरूप सांगताना म्हणतो, 'दारू मोठ्या विनाशक शक्तीची आहे. भक्कम इमारती दारूच्या चार थेंबांनी मातीला मिळतात. माणसांची मांजरं-कुत्री व्हायला वेळ लागत नाही. दारू सर्वसद्गुणी पुरुषाचा पशू करून टाकते. '

शासनात समाजकल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग अशी समाज-हिताची नाटकं करणारी ढोंगी विभाग रचना आढळते. दारूबंदी करायची नाही. पण दारुड्याने आत्महत्या केली की, त्याच्या दुदैर्वी कुटुंबाला पाच-दहा हजार रुपयांची भीक घालायची, हा शासनव्यवस्थेचा विचित्र कारभार आहे. हल्ली दारू उत्पादक भाडोत्री संशोधन जाहीर करून रोज 'एकच प्याला' आरोग्यासाठी आवश्यक आहे, असं म्हणतात. पण गडकरी एकच प्यालाचा अनर्थ असा सांगतात, 'दारूची सवय सुटण्याचा काळ ती लागण्यापूर्वीच काय तो असतो. पहिला एकच प्याला घेण्यापूर्वी भावी मद्यप्याचा हात धरला तर फायदा होईल. ज्यानं एकदा एकच प्याला घेतला, त्याला शेवटचा एकच प्याला घ्यावाच लागतो. दारूबाज दारूतच मरायचा, हे ब्रह्मवाक्य आहे.'

सनातनी शास्त्री पंडितांनी स्त्रीवगार्ला खूप छळलंय; आता राहिलेला छळ दारुडे कुटुंबप्रमुख करून त्यांना नरकयातना भोगायला लावतात. कच्च्या-बच्च्यांना भिकेला लावतात. म्हणूनच आता स्त्रिया व जाणत्या पोरांनी दारूबंदी, दारूचा निषेध, दारूसह दारुड्याचा बहिष्कार करण्यासाठी निकराचा लढा दिला पाहिजे. दारू उत्पादकांच्या तोंडालाडांबर फासलं पाहिजे. गुत्ते उद्ध्वस्त करून गुत्त्याच्या मालकांचं जीवन हराम करून सोडलं पाहिजे. दारूच्या जाहिरातींचे फलक जाळले पाहिजेत. शासकांनी अशी समाजविघातक कृत्यं कायद्यात बसवली पाहिजेत. गांधी जयंती हा 'दारूबहिष्कार,मद्यनिषेध, व्यसन उच्चाटन दिन' म्हणून पाळून मद्य उत्पादकांचे पुतळे जाळणं, जनजागृती मोहीम, वक्तृत्व-निबंध-पोस्टर स्पर्धा समाजाच्या सर्व थरांत राबवल्या पाहिजेत. गडकरी शेवटी विनंती करतात, 'दोस्ताला आणि दुष्मनालाही हात जोडून सांगा की, साऱ्या अनथार्चे कारण दारू आहे, तिच्यापासून दूर राहा !' म्हणून लक्षात ठेवा-.

सुखी संसारांना दारू लावी आग
करी बेचिराख । घरे-वाडे ॥१
दारुड्याची पोरे । बायको बिचारी
भीक दारोदारी। मागतात ॥२
संपत्ती, विद्वत्ता। सारे नष्ट करी
दारू अशी भारी। भयंकर ॥ ३
दारूने उद्ध्वस्त। केली किती राज्ये
माती खाती राजे। दारूपायी ॥४
माणसाचा पशू। करी जादू तिची
फौज सैतानाची । जागविते ॥५
दुष्कृत्ये कराया। प्रेरणा ती देते
पाप घडविते। उन्मादाने ॥६
घडवितो नाश। तिचा एक थेंब
ठेवा तिला लांब । नका स्पर्श ॥७
दारू हद्दपार करा जगातून
जगाचे कल्याण। साधावया ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# छत्रपती शाहू । थोर ज्ञाननिष्ठ

आधी केले मग सांगितले हा आदर्श जी माणसं अफाट ताकदीची असतात, ती कटाक्षाने पाळतात. म्हणूनच युगद्रष्ट्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८ एप्रिल १९०१ रोजी भारतातील पहिल्या विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना आधी केली. त्यानंतर १५ एप्रिल १९२० या दिवशी श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या कोनशिला समारंभात अध्यक्ष म्हणून भाषण करताना म्हणाले, 'माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाव कमावलं आहे. हे मी अभिमानपूर्वक सांगतो. त्यांचं उदाहरण लोकांपुढे आल्याने हा कित्ता पुष्कळ ठिकाणी गिरवला गेला आहे. ब्रिटिश पार्लमेंटला मदर ऑफ पार्लमेंट्स असं मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असं सार्थ यश मिळालं आहे. '

छत्रपती शाहू महाराजांचं वागणं असं आदर्श तर होतंच, पण एका संस्कृत वचनानुसारही ते एक महान सत्पुरुष होते. ह्यचित्ती, वाची, क्रियायांच साधुनामेकरूपता' असं म्हटलं जातं. अर्थात, महापुरुषांच्या मनात एखादा विचार येताच, ते त्यानुसार कृती करतात आणि त्याविषयी बोलतात. छत्रपती शाहूंनी मराठा विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना करण्यापूर्वी १८९६मध्येच त्या दृष्टीने पावलं उचलली होती. पण महाराजांचा हा प्रयोग फसला होता. प्रसिद्ध इतिहासकार डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, 'वास्तविक १८९६मध्येच कोल्हापुरात उच्चशिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी दरबारच्या खचार्ने एक वसतिगृह स्थापन केलं गेलं होतं. असिस्टंट जज्ज व्ही.बी.गोखले हे त्याचे अध्यक्ष होते. वसतिगृहाची सर्व व्यवस्था ब्राह्मण मंडळींकडेच असल्याने एकाही ब्राह्मणेतर मुलास तेथे प्रवेश दिला जात नव्हता. शैक्षणिक सुविधांची मक्तेदारी ब्राह्मण वर्गच उपभोगत होता. कारण शिक्षण हे आपल्याच मक्तेदारीचं आहे, अशी त्यांची मनोभूमिका होती.' या तत्कालीन भटी कारस्थानाला बाजूला ठेवून महाराजांनी आपली वसतिगृहाची भावी योजना न्या. रानडे व गोखले यांना सांगितली. त्या दोघांनी ती उचलून धरली. या दरम्यान, शाहू महाराजांनी पन्हाळ्यावरील दत्तमंदिरात पी.सी. पाटलांसह चार कॉलेज विद्यार्थ्यांची राहाण्या- जेवण्याची स्वखचार्ने सोय करून मराठा वसतिगृह सुरू केलं होतं. तेच पुढे कोल्हापुरास नेण्यात आलं आणि त्याचं नामकरण व्हिक्टोरिया नेण्यात आलं आणि त्याचं नामकरण व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग असं करण्यात आलं. महाराजांच्या द्रष्टेपणामुळे आज बहुजन समाज विद्येच्या क्षेत्रात न बिचकता दिमाखाने पाऊल टाकतो आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी ही अभूतपूर्व क्रांतिकारी वसतिगृह चळवळ उभी केली नसती, तर महाराष्ट्र आज जसा थोडाफार भटमुक्त झाला आहे, तसा झाला नसता. माजी उपप्रधानमंत्री यशवंतराव चव्हाणांसारखं पुरोगामी नेतृत्व महाराष्ट्राला लाभलं नसतं. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखं झंझावती, शिक्षण प्रसारासाठी इरेला पेटणारं व्यक्तिमत्त्व निर्माण झालं नसतं. बॅरिस्टर पी. जी.पाटील यांच्यासारखा विद्याव्यासंगी महापुरुष बहुजन समाजाला लाभला नसता. महाराष्ट्रातील ज्या ज्या शिक्षण संस्थांनी वसतिगृहांची स्थापना केलेली आहे, तिचं प्रेरणास्थळ आहेत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज ! त्यांच्या वसतिगृह चळवळीची फलनिष्पत्ती सांगताना डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, 'या चळवळीने आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी शेकडो कर्तबगार व्यक्ती उदयास आणल्या. कृषितज्ज्ञ डॉ.पी.सी. पाटलांच्यापासून पंजाबचे गव्हर्नर डी.सी. पावटेंपर्यंत, साहित्यिक ग.ल. ठोकळांपासून शिक्षणतज्ज्ञ जे.पी.नाईकांपर्यंत, लोकनेते बाळासाहेब देसाईपासून कम्युनिस्ट नेते कॉम्रेड मिरजकरांपर्यंत निरनिराळ्या क्षेत्रात चमकलेल्या व्यक्ती कोल्हापुरातील शाहू महाराजांच्या वसतिगृहात राहून शिकून पुढे आल्या.' मुंबई-पुण्यानंतर कोल्हापूर हे विद्याभ्यासाचं केंद्र म्हणून पुढे आलं, ते वसतिगृहामुळेच !

छत्रपती शाहू महाराज हे जातिप्रथेचे निर्मूलनकर्ते म्हणून प्रसिद्ध असूनही त्यांनी लिंगायत, मुस्लीम, अस्पृश्य, सोनार, शिंपी, पांचाळ, गौड सारस्वत, इंडियन ख्रिश्चन, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू, वैश्य, ढोर-चांभार, सुतार, नाभिक, कोष्टी, सोमवंशीय आर्यक्षत्रिय ह्या जातींसाठी वेगळी वसतिगृहं का काढली, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. आपापल्या जातीच्या वसतिगृहात मुलांनी विनासंकोच राहावं, सर्व व्यवहार खुलेपणाने करावेत आणि इतर जातींचं मानसिक दडपण त्यांच्यावर येऊ नये, हा तर हेतू अशा जातिपूरक वसतिगृह निर्मितीमागे छत्रपती शाहूंनी ठेवला होताच. पण त्यामागे त्यांचा आणखी एक उदात्त हेतू होता, तो सर्वांगीण समजोन्नतीचा ! प्रत्येक जातीला त्यांचा स्वतःचा नेता, पुढारी, कर्ता, मार्गदर्शक या वसतिगृहाच्या माध्यमातून लाभावा, तयार व्हावा, असं राजर्षींना वाटे. कोल्हापुरात छत्रपती शाहूंनी वीस वसतिगृहं काढली आणि शिक्षणकार्याची गती असाधारण वाढली. महाराष्ट्राला पुरोगामित्त्व दिलं महात्मा फुले यांनी आणि ते जोपासून वाढवलं छत्रपती शाहू महाराजांनी ! या वसतिगृहांसाठी जागा, जमिनी, पैसा, भांडी-कुंडी, कायमस्वरूपी उत्पन्नाची साधनं या दूरदर्शी महापुरुषांनी उदारपणे दिली. त्यांचा आदर्श गिरवणं आजही आपल्या शासनकर्त्यांना शक्य होऊ नये, यासारखं भारताचं दुसरं दुर्भाग्य नाही. भारताला महाशक्ती करायचं असेल, तर सर्व शिक्षण वसतिगृहयुक्त झालंच पाहिजे. कारण-

छत्रपती शाहू । थोर ज्ञाननिष्ठ
ज्ञानासाठी कष्ट । खूप केले ॥१
झोपडीच्या दारी । ज्ञानगंगा नेली
तृषा भागविली । अज्ञान्यांची ॥२
गाव तेथे शाळा। दिली उघडून
युगाचे अज्ञान । करी दूर ॥ ३
वसतिगृहांची। रेलचेल केली
विद्याप्राप्ती झाली । दीन छात्रा ॥४
थोर ज्ञानकेंद्र। कोल्हापूर होई
उजळून जाई । महाराष्ट्र ॥ ५
नव्या नेतृत्वाचा । येथे जन्म झाला
बहुजन आला । उजेडात ॥६
वसतिगृहे ही। जनित्रे विद्येची
भीती अंधाराची । आता नाही ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सिईओ कुलदीप जंगम यांनी केली भंडीशेगाव पालखी तळाची पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या वतीने पालखी मार्गावर देणारे येणारे विविध सुविधांची युध्दपातळीवर जय्यत तयारी सुरू आहे. आज पालखी मार्गावरील विविध सुविधांची व पालखी तळाची अंतीम टप्प्यातील कामांची पाहणी जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केली. वाखरी पालखी तळांवर पिण्याच्या पाण्याच्या टाकीवर ग्रामपंचायतीचा विद्युत रोषणाई केली आहे.



पालख्या सोलापूर जिल्ह्यात आगमन होणे पुर्वी शेवटचा मुक्काम असलेल्या वाखरी येथील सुविधा अंतीम टप्प्यात असून पुर्णत्वाकडे नेल्या जात आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आज वाखरी व भंडाशेगाव येथील पालखी तळ, स्नानगृहाची व्यवस्था तसेच शौचालय बसविणेची ठिकाणे आदी कामांची पाहणी केली. त्यांचे समवेत उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, गटविकास अधिकारी सुशील संसारे, बांधकाम विभागाचे उप अभियंता लोटके, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता करवटे, यांचे सह विभाग प्रमुख उपस्थित होते.

### वाखरी येथे पाण्याच्या टाकीवर विद्युत रोषणाई

पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथील ग्रामपंचायतीना जलजीवन मिशन अंतर्गत उभारण्यात आलेल्या नवीन पाण्याच्या टाकीवर विद्युत रोषणाई केली आहे. भाविकांना पुरेसे पिण्याचे वापरा साठी पाणी उपलब्ध करून देणेत येत आहेत. आज या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम तसेच प्रकल्प संचालक अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी पाहणी केली. परिसरात शौचालया साठी तसेच स्नानगृहासाठी च्या पाण्याची व्यवस्थेची पाहणी केली.

### वारकरी यांची सेवा म्हणून काम करा - अतिरिक्त सिईओ कोहिणकर

पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींनी खुप निष्ठेने काम करीत आहात. या सेवेत तसूभर देखील कमतरता पडू देऊ नका. सेवा म्हणून काम करा. अशा सुचना अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी दिल्या. पंचायत समिती पंढरपूर च्या शेतकी सभागृहात त्यांनी अंतीम टप्प्यात असलेल्या कामाचा आढावा घेतला. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, गटविकास अधिकारी सुशील संसारे यांचे सह विभाग प्रमुख व पंचायत अधिकारी उपस्थित होतें.

निवास व्यवस्था साठी जर्मन हँगर मंडपाची उभारणी अंतिम टप्प्यात आहे. या सर्व ठिकाणी विद्युत सेवा, मोबाईल चार्जिंग सेवा तसेच या ठिकाणी जाणारे मागार्ची दुरुस्ती चा आढावा अतिरिक्त सिईओ कोहिणकर यांनी घेतला.

### ग्रामसेवक व नोडल अधिकारी यांची बैठक वाखरी येथे जर्मन हँगर मंडप

वाखरी ता.पंढरपूर येथील जर्मन हँगर मंडप पाहणी जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी केली. बालविकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव, बालविकास प्रकल्प अधिकारी पंढरपूर समाधान नागणे,ग्रामपंचायत वाखरी च्या सरपंच श्रीमती धनश्री साळुंखे माजी सरपंच व विद्यमान सदस्य कविता पोरे ग्रामपंचायत अधिकारी एस एस शिंदे यांचे सह मंडप व पालखी तळाची पाहणी केली.

# नातेपुते येथील विद्यार्थी शिक्षक करणार वारकऱ्यांची चरण मसाज सेवा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोमवार दिनांक ३० जून रोजी श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा नातेपुते मुक्कामी येत असून पालखी सोहळ्यातील वारीच्या मार्गावर पुणे सातारा सोलापूर व इतर जिल्ह्यातील वारीमध्ये पायी चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयातील ३० विद्यार्थी व १५ शिक्षक हे वारकऱ्यांची वेशभूषा परिधान करून आरोग्य योजनेबाबत जनप्रबोधन तसेच चिकित्सा सेवा व चरण सेवा पायांची मसाज करणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे नूतन प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम यांनी दिली. सदर आरोग्य सेवेचा उपक्रम महाविद्यालयाच्या चेअर पर्सन सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पद्मजादेवी मोहिते पाटील, संचालक मार्गदर्शक डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, उर्वशीराजे मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार असून त्यासाठी १० बाय ४० चा मोठामंडप उभारण्यात येणार आहे त्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी शुद्ध पाण्याचे जार ठेवण्यात येणार आहेत तसेच वारकऱ्यांना बसण्यासाठी खुर्ची व पाय ठेवण्यासाठी स्टूल व चरण सेवा पायांची मसाज करण्यासाठी उत्कृष्ट दजार्चे तेल त्या ठिकाणी मसाज करताना वापरण्यात येणार आहे ही चरण सेवा वारकऱ्यांच्या पायाची मसाज करणे हे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे भाग्यच आहे ही सेवा केल्यामुळे आम्हाला मोठे समाधान मिळणार असल्याचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम यांनी सांगितले या उपक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## नव्याने गीत हृदयातून

डोंगर वारा उनाड पाऊस
मुक्त मनाला करून टाकू
फेकून देऊ साचले ते मनी
कोरी पाटी करून टाकू...
नाचू गाऊ हिरव्या गालिच्यावर
वाहत्या गंगेत वाहू
हितगुज करु हिरव्या वृक्ष वेलीशी
मन हिरवे करून टाकू...
धुंदी आसमंताला आलि
आपण ही बेधुंद होऊन जाऊ
मेघ दाटून आले गिरी शिखरावर
मेघावर स्वार होऊन टाकू....
मन मानेल तसे हुंदडायला
मोठा पाऊस दुधाळ वारा सुटला
दौडू द्या घोडे चौफेर नजर
दऱ्याखोऱ्याला व्यापून टाकू....
आठवणींचा पसारा नको आता
गुंता सोडवायला पाऊस आला
पुन्हा नव्याने निर्मिती चे गीत
हदयी जागृत करून टाकू....

**- श्री.श्रीकांत मोरे**

पान १ वरून

# क्रांती-परीस लोकनेते प्रतापसिंह...

प्रगती आणि युवकांची जनजागृती विचारात घेतली तर पप्पासाहेबांच्या कर्तृत्वाची साक्ष पटेल.

शेतकऱ्यांचे व सामान्य लोकांचे नेमके प्रश्न ओळखण्याची कला काकासाहेबांकडे होती व अगदी तोच वारसा पप्पासाहेबांनी उचलला व कायम केला. पुणे जिल्ह्यातील धरणातुन २० टी.एम. सी. पाणी प्रथम उजनी धरणात सोडावे व उजनी धरणातील पाणी ठराविक एखाद्या बोगद्यात न सोडता ते पाणी पक्षपात न करता जिल्यातील सर्व तालुक्यांना समान प्रमाणत मिळावे यासाठी दि. २६/१२/२०१२ रोजी टेंभूर्णी येथे जनसेवा संघटनेतर्फ महा रस्ता रोखो आंदोलन करून, पप्पासाहेबांनी सत्ताधाऱ्यांचा विरोध बाजूला सारून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. म्हणून पप्पासाहेबांच्या व्यक्तीमत्वाबद्दल म्हणावेसे वाटते..

जाणूनी भटकंती गरिबांची
पेरिले जनसेवा गावोगाव..
जनता लेकुरे तुमची,
तुम्ही जनतेचे देव.

अशा निष्पृह जनसेवक लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील उर्फ पाप्पासाहेबांना ६७ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !!

**- मयुर नवनाथ माने**
सरचिटणीस-महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना
मा.उपसरपंच ग्रामपंचायत गिरझणी

# ब्रिजमोहन फोफलिया आयडियल इंग्लिश स्कूलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ब्रिजमोहन फोफलिया आयडियल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये संस्थेचा 15 वा वर्धापन दिन सोमवार 23 जून रोजी मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ब्रिजमोहन फोफलिया उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन चव्हाण विराजमान होते, तर संस्थेच्या सचिवा ज्योती चव्हाण यांची विशेष उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने करण्यात आली. शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत मुख्याध्यापिका उर्मिला कटप यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

कार्यक्रमात दहावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. दहावीचा शंभर टक्के रिझल्ट अनेक वषार्पासून लागत आहे विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

या शाळांमध्ये आधुनिक वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, आणि क्रीडांगणे, बेसिक संगणक प्रशिक्षण व ई-लर्निंग वर्ग. यांसारख्या सुविधा उपलब्ध असतात.क्रीडा, कला, संगीत, आणि इतर ॲक्टिव्हिटीजसाठी या शाळांमध्ये विशेष संधी उपलब्ध असतात.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका आसिया शेख आणि सविता सावंत यांनी केले.

## वात्रटिका

### अपेक्षांचे ओझे

तिला कमी पडले गुण
बापाने उधळले अवगुण...
अवास्तव अपेक्षाने झाला
बापाकडून लेकीचा खून...
क्षमतेपेक्षा ओझे देऊन
अपेक्षा वाढवल्या जातात...
आई बापाच्या प्रतिष्ठेपुढे
लेकरं जिवानिशी मरतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रस्त्यावर कचरा टाकल्यास होणार दंडात्मक कारवाई - मुख्याधिकारी रोकडे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरात आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक, वारकरी येतात. सोहळ्यानिमित्त भाविकांचे, वारकऱ्यांचे दशमी, एकादशी व व्दादशी असे तीन दिवस वास्तव्य असते. त्यामुळे वारकरी, भाविकांचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. याकरीता पंढरपूर नगरपालिका स्वच्छता मोहिम राबवत आहे. मात्र, शहरातील व्यक्ती, दुकानदार, व्यावसायिक, मठधारक, किरकोळ विक्रेते हे रस्त्यावर कचरा टाकणे, कचरा जाळणे, तसेच उघड्यावर लघुशंका करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर मलविष्ठा, मुत्रविष्ठा करणे, उघड्यांवर शौच करणे टाळावे, अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशा सुचना मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिल्या आहेत.

पंढरपूर नगरपरिषदेने जाहीर सूचनेद्वारे आवाहन केले आहे की, केंद्र शासनाने अधिसूचना क्रमांक एस.ओ. 1357 (3) दि. 08 एप्रिल 2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरांमध्ये प्रभावीपणे चालू आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती, सेवा, दुकानदार, व्यावसायिक, मठधारक, किरकोळ विक्रेते यांच्याकडून नियमाचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करत दंड वसूल करण्यात येणार आहे.

दंड वसूल करण्यासाठी आरोग्य निरीक्षक, मुकादम, प्राधिकृत केलेले कर्मचारी यांना अधिकार देण्यात येत आहेत. तरी घनकचरा अधिनियम धोरणातील तरतुदींची अंमलबजावणी करून आपले शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिक, भाविक, वारकरी, दुकानदार यांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

महास्वच्छता अभियान कार्यक्रमास ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही पंढरपूर शहरातील सर्व नागरिक व्यापारी, व्यावसायिक यांनी आपापल्या दुकानासमोर कचरा टाकण्यासाठी छोट्या छोट्या कचरा पेट्या ठेवाव्यात. त्यामध्येच कचरा टाकून तो नगरपालिकेच्या कचरा संकलन टीम कडे द्यावा. त्याप्रमाणेच विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत येणाऱ्या वारकरी, भावीक यांनीही कचरा कोठेही रस्त्यावर टाकू नये. नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या जवळपासच्या कचराकुंड्यामध्येच कचरा टाकावा, असे आवाहन केले होते. असेही मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

**अशी असेल दंडात्मक कारवाई-**

- रस्त्यावर कचरा टाकणे-180 रुपये दंड.
- कचरा जाळण-5000 रुपये दंड
- उघड्यावर लघुशंका करणे, 1000 रुपये दंड
- सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, 150 रुपये दंड
- उघड्यावर मलविष्ठा, मुत्रविष्ठा करणे-200 रुपये दंड
- उघड्यांवर शौच करणे - 500 रुपये दंड

# आयुक्तांपुढे दिव्यांगांचा ठिय्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून आलेल्या पत्राच्या अनुषंगाने महापालिकेतील ७८७ दिव्यांग बांधवांचा भविष्य निर्वाह भत्ता बंद केला आहे. महापालिकेच्या निर्वाह निधीतून वगळण्यात आलेल्या दिव्यांग बांधवांनी सोमवारी (दि. २३) महापालिका आयुक्तांच्या दालनासमोर तब्बल तीन तास ठिय्या मारला. आंदोलनकर्त्यांना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे सामोरे गेले. त्यांचे निवेदन स्वीकारले. त्यानंतर दिव्यांग बांधवांनी आयुक्तांसमोर आपली कैफियत मांडली. इतर महापालिका, शासन निर्णयाची माहिती घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिव्यांगांना दिले.



**शासन निर्णय असा**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने महापालिका आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या दिव्यांगांना ना हरकत प्रमाणपत्र देऊ नये, त्यांचा उदरनिर्वाह भत्ता बंद करावा, असे पत्र आल्याने महापालिकेतील ७८७ दिव्यांगांचा उदरनिर्वाह भत्ता न देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नावे वगळण्यात आल्याचे प्रशासनाकडून दिव्यांगांना सांगण्यात आले.

महापालिका प्रशासनाकडे नोंद असलेल्या ५० टक्के दिव्यांग व्यक्तींना दिला जाणारा ७८७ जणांचा उदरनिर्वाह भत्ता बंद केला आहे. शासनाच्या दोन योजनांचा फायदा हे लाभार्थी घेत असल्याने महापालिका प्रशासनाच्यावतीने हा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेच्या दिव्यांग योजनेतून त्यांना वगळ्यात आले आहे. महापालिकेच्या कामगार कल्याण विभागाकडून शहरातील दिव्यांगाची नोंद घेतली जाते. दिव्यांगांना उदरनिर्वाह भत्ता म्हणून प्रति महिना एक हजार रुपये दिले जातात. ऑनलाईन पद्धतीने त्यांच्या खात्यावर ते जमा केले जातात. महापालिकडे अशा तीन ते चार हजार दिव्यांगाची नोंद आहे.

प्रतिवर्षी हयातीचा दाखला द्यावा लागतो. ज्यांनी हयातीचे दाखले दिले आहेत, अशा लाभार्थ्यांच्या खात्यावर निर्वाह भत्ता जमा केला जातो. महापालिकेच्या बजेटमध्ये यासाठी कोट्यवधींची तरतूद केली आहे. त्या निधीतून शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेत नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. शासनाच्या कोणत्याही एका योजनेचा लाभ घेण्याबाबत शासन निर्णयानुसार कळविले आहे. सोलापूर महापालिकेतील दिव्यांग

उदरनिर्वाह भत्ता घेणारे लाभार्थी व संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणारे या दोन्ही योजनांचा लाभ घेणारे लाभार्थी महापालिकेकडील ७८७ आहेत. त्यांचा उदरनिर्वाह भत्ता बंद केला आहे. या नावाची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर व कामगार कल्याण व जनसंपर्क विभागाकडील कार्यालयात लावली आहे. अकराशे दिव्यांगांच्या खात्यावर दोन महिन्याचा निर्वाह भत्ता जमा झाला आहे. ७८७ दिव्यांगांचा निर्वाह भत्ता जमा झाला नाही.

# शक्तिप्रदर्शन रस्त्यावर नको, करायचे असेल तर सभेत करा!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहरम हा सण हिंदू-मुस्लिम एकत्र साजरा करतात. आषाढी एकादशी व मोहरम एकाच दिवशी असल्याने एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्सव शांततेत पार पाडावे. कोणालाही शक्तिप्रदर्शन करायचे असेल तर ते सभेत करावे. रस्त्यावर केल्यास ते शोभणारं नाही तसेच मिरवणूक निघते त्यावेळी, बाईक रॅली काढू नका. जर रॅली काढत असाल तर वाहनांची कागदपत्रे जवळ बाळगा नंतर चौकशीला बोलवल्यानंतर नाराज होऊ नका, असे आवाहन पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी केले

मोहरमच्या अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सोमवारी (दि.२३) सायंकाळी ४ वाजता पोलिस आयुक्तालयात शांतता कमिटीची बैठकीत पोलिस आयुक्त एम. राजकुमार बोलत



होते. यावेळी पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगरपालिकेचे नगरअभियंता दिवाणजी, शहर काझी, मुस्लिम धर्मगुरू, मौलाना आदी उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी विविध समस्या मांडल्या. त्यात प्रामुख्याने मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्या काढाव्यात, रस्त्याची साफसफाई करावी, मिरवणूक परवानगी ऑफलाईन देण्याची सोय करावी शिवाय काहीवेळा वाहतूकसंबंधी अडचणी येतात, अशा समस्या मांडल्या. यावेळी मनपाचे नगर अभियंता विभागाचे दिवाणजी यांनी या अडचणी लवकरच सोडवू शिवाय, रस्त्याच्या पोलवर लावण्यात आलेले अनधिकृत बॅनरही हटवू, असे सांगितले.

बैठकीची प्रस्तावना पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी केली. मोहरम उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोणीही, कोणत्याही प्रकारे जबरदस्तीने वर्गणी देणगी मागू नये. सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर मंडप मारताना २/३ भाग मोकळा सोडावा. पंजे सवारी संरक्षणासाठी प्रत्येकाने आपल्याकडील स्वयंसेवक नेमावेत. अफवांवर विश्वास न ठेवता सामंजस्याने वागावे, असे आवाहन केले.

यावेळी पोलिस उपायुक्त अजित बो-हाडे, विजय कबाडे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रताप पोमण, सुधीर खिरडकर, राजन माने, सोलापूर महानगरपालिकेचे सागर खरोसेकर, महावितरण अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, धर्मादय कार्यालयाकडील असिफ शेख, अग्निशामक दलाचे समीर पाटील, किरण चव्हाण आदी उपस्थित होते.

**मुलांवर लक्ष ठेवा**

उत्सव साजरा करताना कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलिसांशी संपर्क साधावा. शिवाय पालकांनी आपली मुलं कुठं जात आहेत, याची माहिती घ्यावी, असे आवाहन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

# जनप्रतिपालकः लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील

**१९९०** च्या दशकात सोलापूर जिल्ह्यातील राजकारणात नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक तेजस्वी, कर्तृत्ववान आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्व उदयास आले आणि ते म्हणजे मा. लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील उर्फ पप्पासाहेब. माझे संपूर्ण जीवन हे समाजकार्य, शेतकऱ्यांचे कल्याण आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी अर्पण झालेले आहे असे ठाम पणे सांगणारे, व पुढे एक कुशल प्रशासक, अनुभवी राजकारणी आणि सामाजिक न्यायाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून जनमानसात ओळख निर्माण झालेले गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, व्यावसायिक, उद्योजकांचे प्रेमळ नेते.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचा जन्म एक प्रतिष्ठित आणि सुसांस्कृतिक परंपरांनी समृद्ध अशा मोहिते-पाटील घराण्यात झाला आमदार शंकरराव मोहिते-पाटील (काकासाहेब) व रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते पाटील (अक्कासाहेब) यांचे पाचवे सुपुत्र. त्यांच्या घराण्याकडे पिढीजात जनसेवेचा वारसा लाभलेला असल्याने बालपणापासूनच त्यांच्यावर समाजसेवेचा प्रभाव व जनमाणसासाठी काहीतरी करण्याची भावना होती. म्हणूनच त्यांनी शेती, सहकार, उद्योग, शिक्षण, पर्यटन या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय प्रगती केली, व त्या क्षेत्रात त्यांनी आधुनिक विचारांची, तंत्रज्ञानाची जोड पारंपरिक मूल्यांशी फार सुंदररित्या साधली.राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून, समाजसेवेचे माध्यम असावे या



विचारांनी त्यांनी राजकीय जीवनात प्रवेश केला. सुरवातीला अकलूज ग्रामपंचायतीचे सदस्य ते पुढे खासदार व सहकार राज्यमंत्री असा प्रवास सध्याच्या राजकीय नेत्यांसाठी खूप प्रेरणादायी आहे. १९९२ ते १९९७ च्या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष असताना त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. त्यांचा सच्चा विश्वास लोकशाही प्रक्रियेमध्ये होता, आणि त्यांनी लोकांशी संवाद ठेवून शासनयंत्रणा जनतेच्या हितासाठी कशी कार्यान्वित करता येईल, हे कृतीतून दाखवून दिले.शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रतापसिंह मोहिते-पाटील साहेबांनी अनेक योजनांची अंमलबजावणी केली. जलसिंचन, शेतीमालाच्या हमीभावासाठी प्रयत्न, कृषी विद्यापीठांशी संवाद, आणि शेतीमालास बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच मिळवून देणारी धोरणे यामुळे ते शेतकऱ्यांचे आधारवड ठरले. ते घेत असलेला शेतकरी मेळावा संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध होता व त्यामेळाव्यास हजारो शेतकरी उपस्थित राहत. सदर मेळाव्यास सत्ताधारी मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकार्यांना बोलावून त्यांच्या समोरच शेतकऱ्याचे प्रश्न व अडीअडचणी मांडून ते मार्गी लावत असत.जलसंपदांच्या व्यवस्थापनात त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. जलसंधारण, जलव्यवस्थापन आणि जलदूत योजना यांचा प्रभावी अंमल त्यांनी केला. त्यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील अनेक कोरडवाहू भागांतही पाण्याचा प्रश्न सुटला.त्यांच्या भाषणांमध्ये आणि कृतीमध्ये एक प्रकारची गांभियार्ची आणि प्रगल्भतेची झळाळी असायची. कुठल्याही संकटात त्यांनी धीर सोडला नाही, उलट अधिक संयम आणि दूरदृष्टीने तोडगा काढला. पक्षविचारांवर ठाम असताना देखील त्यांनी सर्वपक्षीय सहकायार्चे तत्त्व पाळले.लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील साहेब हे केवळ एक राजकारणी नव्हते, तर ते एक विचारवंत, समाजसुधारक आणि खऱ्या अथार्ने जनतेचे सेवक होते. त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने लोकहिताची तत्त्वे जपली. आजही महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेच्या हृदयात त्यांचे स्थान अढळ व अजेय आहे. आजही त्यांचा संपूर्ण समाजहित विचारांचा वारसा आमच्या कुटुंब प्रमुख मा. पदमजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील तथा (आईसाहेब) व डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील तथा (दादासाहेब) तंतोतंत जपत असताना पाहावयास मिळतो.त्यांचे कार्य म्हणजे नुसतेच एका युगपुरुषाचे चरित्र नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत आहे. अशा या थोर प्रेरणादायी लोकनेते तथा जनप्रतिपालकाच्या ६७ व्या जयंती निमित्त आमच्या परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन.

**प्रा. डॉ. संभाजी बनसोडे**
(भूगोलशास्त्र विभाग, स.म. शं.मो.पा. महाविद्यालय, नातेपुते)

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** राज्य पातळीवर भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गटाची महायुती असली तरी अक्कलकोट तालुक्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक भाजपने स्वबळावर लढवावी, असा आग्रह कार्यकर्त्यांकडून धरला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना कार्यकर्त्यांकडून स्वबळाच्या भूमिकेसाठी साकडे घालण्यात येत असून आमदार कल्याणशेट्टी यांनी देखील अशा संकेतांमधून पक्षाच्या स्वतंत्र लढतीची शक्यता अधिकच बळकट केली आहे. माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी अलीकडेच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे स्थानिक पातळीवर युती कायम राहणार का अशी चर्चा केली जात होती. मात्र, आमदार कल्याणशेट्टी यांच्या स्वबळाच्या सूचक विधानांमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून, अनेकांना यामुळे मोठा दिलासा मिळाल्याचे




चित्र आहे. आमदार कल्याणशेट्टी कोणत्याही पक्षाशी युती करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले असून माझे संपूर्ण लक्ष अक्कलकोट तालुक्यातील विकासाकडेच राहील, असेही त्यांनी नमूद केले.

भाजप कार्यकर्ते स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणांमध्ये कोणतीही तडजोड न करता पक्षाची ताकद सिध्द करावी, अशी भूमिका घेत आहेत. यामुळे अक्कलकोटमध्ये महायुतीऐवजी भाजप स्वबळावर रिंगणात उतरणा आहे हे प्रकर्षाने दिसत आहे. आत पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उत्पन्न वाढलेल्यांनी अन्नधान्य योजनेचा लाभ स्वेच्छेने सोडावा

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यात सवलतीच्या दरात मिळणाऱ्या मोफत अन्नधान्याचा लाभ ज्या कार्डधारकांचे उत्पन्न वाढले आहे त्यांनी आता स्वेच्छेने सोडावा व योजनेतून बाहेर पडावे, असे आवाहन प्रभारी तहसीलदार संतोष कणसे यांनी कार्डधारकांना केले आहे. राज्य शासनाने गोरगरीब नागरिकांची परिस्थिती ओळखून त्यांना १९९६ पासून रास्तभाव धान्य दुकानातून निर्धारित केलेले कार्डधारक अंत्योदय, बी.पी.एल., ए.पी.एल. असे संवर्ग करुन सवलतीच्या दरात अन्यधान्य विक्री केली जात असे. २०१४ साली अन्नधान्य वितरण सुरक्षा कायदा मंजूर झाला असून त्यामध्ये अंत्योदय व प्राधान्य कुटुंबे असे संवर्ग करण्यात आले आहे. अन्नसुरक्षा कायद्यानुसार ग्रामीण भागात ४४ हजार रुपये तर शहरी भागात ५९ हजार रुपये वार्षिक उत्पन्न मयार्दा निश्चित यासाठी केली आहे. वरील बाबींचा विचार करता अनेक कुटुंबे १९९६ पासून सवलतीच्या दराने धान्याचा लाभ घेत आहेत.



दरम्यान, २०२४ नंतर मंगळवेढा तालुक्यातील बऱ्यापैकी लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. काही कुटुंबांकडे चार चाकी वाहने आहेत. तसेच खासगी व सरकारी मोठ्या पगाराच्या नोकरीवर आहेत. काही शेतकरी बागायतदार असल्याचेही दिसून येत असून अशा शिधापत्रिकाधारकांनी अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्यांनी अन्नधान्याच्या अनुदान योजना सोडणे आवश्यक आहे. असे लाभधारक धान्य घेणे सोडत नसल्याने २०२४ पासून नवीन इस्टांकानुसार शासनाकडे मागणी करुन अद्यापपर्यंत ते प्राप्त न झाल्याने खऱ्या लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेत लाभ देता येत नाही.

**शासनास सहकार्य करावे**

ज्या कुटुंबाकडे चारचाकी वाहने तसेच दोन एकरापेक्षा जास्त जमीन बागायत आहे. त्याचबरोबर कुटुंबातील व्यक्ती खासगी कंपनी अथवा शासकीय नोकरीस आहे. ज्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे. अशा सर्व कार्डधारकांनी स्वेच्छेने अन्नधान्य अनुदानातून बाहेर पडून शासनास सहकार्य करावे..

**संतोष कणसे,** प्रभारी तहसीलदार

